# महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ

(महाराष्ट्र शासनाचे वैद्यानिक महामंडळ)

**३२ वा मजला, सेंटर -१ इमारत, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.**

दुरध्वनी : (०२२) ६९९६५५५५ फॅक्स : २२१५१६७ ई-मेल : info.mahasecurity@maharashtra.gov.in / dirrecruitment.mahasec@gmail.com


जा.क्र.मरासुम/भरती/३५८७ /२०२६ दिनांक : ११.०८.२०२६

## -: पुरुष सुरक्षा रक्षक (कंत्राटी) भरती नोंदणी प्रक्रिया माहे ऑगस्ट -२०२६ उमेदवारांसाठी सूचना :-

### अ) प्रस्तावना :-

१) महाराष्ट्र पोलीस शिपाई भरती सन २०२४-२०२५ च्या पोलीस भरती मधील लेखी व मैदानी परिक्षेत पात्र उमेदवार यांची यादी महामंडळात पुरुष सुरक्षा रक्षक (कंत्राटी) पदाच्या भरती नोंदणी प्रक्रियेसाठी राज्य पोलीस दलाच्या संबंधीत विभागांकडून मागविण्यात आली आहे. त्यानुसार परिपुर्ण यादी पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रामीण)/ अहिल्यानगर/ सांगली या तीन जिल्हा विभागातून प्राप्त झाली आहे. त्या उमेदवारांची भरती प्रक्रिया हि दि.१८.०८.२०२६ ते दि.२५.०८.२०२६ पर्यंत (सार्वजनिक व साप्ताहिक सुट्टी वगळून) ६ दिवस आयोजित करण्यात आली असून उमेदवारांनी भरतीसाठी हजर होण्याचा दिनांक व वेळ निहाय यादी महामंडळानी दिलेल्या https://www.mahasecurity.gov.in/recruitment संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

२) महामंडळामार्फत उमेदवारांनी त्यांच्या नावासमोर दिलेल्या दिनांक व वेळ निहाय यादी प्रमाणे महामंडळाचे निकष पडताळणीसाठी महामंडळाचे कार्यालय १२ वा मजला, सेंटर-१ इमारत, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड मुंबई -४०० ००५ येथे हजर रहावे. त्यासाठी संदेश दिलेल्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्यात येत आहे. **ज्या दिवशी ज्या उमेदवार यांची नावे दिलेली आहेत. त्याच दिवशी हजर राहावे. कारण त्याच उमेदवार यांची नावे सॉफ्टवेअर मध्ये दिसणार आहे. याची कृपया नोंद घ्यावी.** कळविलेल्या दिवशी गैरहजर राहील्यास त्यानंतर त्यांना पुन्हा प्रवेश दिला जाणार नाही व भरती नोंदणी प्रक्रिया माहे ऑगस्ट-२०२६ करीता विचार केला जाणार नाही.

### ब) महत्त्वाच्या सुचना :-

१) पोलीस शिपाई भरती प्रतिक्षा यादीतील उमेदवार असल्याने महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक (कंत्राटी) भरती नोंदणी व निकष पडताळणीकरिता **https://mssc.co.in/application/** ही लिंक ओपन करुन देण्यात आली आहे. गोपनीयतेच्या कारणास्तव सदर यादीमध्ये उमेदवार यांचे Application ID क्रमांक अंशत: दर्शविण्यात आले आहेत. उमेदवारांनी त्यांचेकडे असलेल्या पोलीस भरती २०२४-२०२५ चे आवेदन पत्र / मैदानी - लेखी परीक्षेचे हॉल तिकीट प्रमाणे स्वत:च्या Application ID व इतर तपशील तपासून दिलेल्या लिंकवर ऑनलाईन फॉर्म परिपूर्ण भरावा.

२) उमेदवार यांनी पोलीस भरती आवेदन पत्र भरताना जे मोबाईल नंबर दिलेले आहेत त्याच मोबाईल नंबर वर महामंडळामार्फत मेसेज सोडण्यात आलेले आहे. त्यामुळे मेसेज प्राप्त झाला असेल तरी ते पोलीस भरती मधील उमेदवार आहेत व त्यांच्याजवळ पोलीस भरतीचे आवेदन भरल्याची पावती किंवा पोलीस भरती मैदानी/ लेखी परिक्षेचे हॉल तिकिट आहे व त्यावर त्याचा Application ID नमुद आहे, त्या उमेदवार यांनी सदरच्या कागदपत्रासह नोंदणीसाठी हजर राहणे बंधनकारक असून त्याशिवाय प्रवेश देण्यात येणार नाही व भरती प्रक्रियेतून बाद करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

..२/-

३) **उमेदवारांनी खालील कागदपत्र ऑनलाईमध्ये जोडणे तसेच भरती निकष पडताळणीच्यावेळी मुळ कागदपत्र घेवुन येणे आवश्यक आहे.**

i) १० वी (SSC Board) चे प्रमाणपत्र.

ii) १२ वी (HSC व समकक्ष) पास गुणपत्रिका व प्रमाणपत्र.

iii) जन्म दाखला किंवा शाळा सोडण्याचा दाखला / १० वी (SSC Board) चे प्रमाणपत्र ज्यावर जन्मतारीख नमुद असते / बोनाफाईड प्रमाणपत्र.

**iv)** आधार कार्ड **(आधार कार्ड वर कागदपत्रानुसार नावाची स्पेलिंग असणे तसेच त्यावर जन्मतारीख पूर्ण असणे आवश्यक आहे.)**

v) पॅन कार्ड.

vi) अधिवास प्रमाणपत्र.

vii) वाहन चालवण्याचा परवाना (असल्यास), संगणकाचे ज्ञान असल्याबाबचे प्रमाणपत्र व इतर उच्च शैक्षणिक प्रमाणपत्र.

viii) **पोलीस भरतीचे आवेदन पत्र तसेच मैदानी व लेखी परिक्षेस हजर राहील्याबाबतची प्रवेश पत्र ज्यावर Application ID नोंद आहे. असे कागदपत्र सोबत आणणे अनिवार्य आहे. त्याशिवाय आतमध्ये प्रवेश देण्यात येणार नाही.**

४) शासनाचे सर्व साधारण नियम विचारात घेता, सन-२०२४-२५ च्या पोलीस भरतीच्यावेळी अर्ज दाखल करण्याच्या अंतिम तारखेस म्हणजेच **दि. ३०.११.२०२५ रोजी ३३ वर्षेपर्यंत वयोमर्यादा असलेल्या उमेदवारांना महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाच्या सुरक्षा रक्षक भरतीसाठी पात्र ठरविण्यात येणार आहे**. दिनांक ३०.११.२०२५ रोजी ३३ वर्षे वयापेक्षा जास्त वय असणाऱ्या उमेदवारांना भरती नोंदणीत अपात्र ठरविण्यात येईल. याकरिता उमेदवारांनी वयोमर्यादा तपासणीसाठी वयाचा पुरावा म्हणून जन्मदाखला/ शाळा सोडल्याचा दाखला/ दहावी बोर्ड प्रमाणपत्र (जन्मतारीख असलेले) ही कागदपत्रे सोबत आणावीत. अशा प्रकारे जे उमेदवार दि.३०.११.२०२५ रोजी १८ ते ३३ वर्ष वयाच्या मर्यादेत असतील त्यांनीच Online फॉर्म भरावेत. अन्यथा, वय वर्ष १८ पेक्षाकमी व वय वर्ष ३३ वयापेक्षा जास्त वय असणाऱ्या उमेदवारांना अपात्र ठरविण्यात येणार आहे याची उमेदवार यांनी नोंद घ्यावी.

५) पुरुष उमेदवार भरती नोंदणी प्रक्रियेवेळी हजर होणाऱ्या पुरुष उमेदवार यांची पुरुष पोलीस शिपाई यासाठी असणाऱ्या उंचीचे निकषाप्रमाणे किमान १६५ सेमी उंची तसेच छाती न फुगवता किमान ७९ सेमी असावी आणि छाती किमान ५ सेमी फुगवता आली पाहिजे. त्याप्रमाणे निकष पडताळणी करण्यात येणार आहे, याची नोंद घेण्यात यावी.

६) नोंदणीच्या दिवशी येताना ऑनलाईन फॉर्म भरलेल्याची प्रिंट काढून सोबत आणावी. तसेच सर्व संबंधीत मुळ कागदपत्रे सोबत आणावी. उमेदवार नोंदणीसाठी हजर राहतांना दिलेल्या लिंकवर फॉर्म भरलेला नसल्यास व येतांना त्याची प्रिंट व मुळ कागदपत्रे सोबत न आणल्यास त्यास अपात्र समजण्यात येईल व त्याची नोंदणी होणार नाही, याची नोंद घ्यावी.

**क) इतर सर्वसाधारण सुचना :-**

१) भरती नोंदणी प्रक्रियेसाठी उमेदवारांना स्वखर्चाने हजर रहावे लागेल. तसेच उमेदवारांना भोजन व निवास याची व्यवस्थासुद्धा स्वत:च्या खर्चाने करावी लागेल. महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाकडून उमेदवारांसाठी कोणतीही व्यवस्था करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

MAHARASHTRA STATE SECURITY CORPORATION सत्यमेव जयते M. S. MUMBAI

..३/-

२) निकष पडताळणीसाठी दिलेल्या दिनांक व वेळेस हजर रहावे. त्यापुर्वी कोणीही भरती नोंदणीसाठी दिलेल्या केंद्राच्या ठिकाणी येवु नये. सदर ठिकाणी वेळेच्या आधी आल्यास तेथे प्रवेश दिला जाणार नाही. तसेच ज्या उमेदवारांना मोबाईलवर संदेश प्राप्त झालेला आहे. त्यांनीच सदर ठिकाणी हजर रहावे व इतरांना प्रवेश दिला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

३) जे उमेदवार यापूर्वी महाराष्ट्र सुरक्षा बलात कार्यरत आहेत / किंवा कार्यरत होते व ज्यांची सेवा कसुरीमुळे समाप्त करण्यात आली आहे किंवा करार खंडीत करण्यात आला आहे अथवा प्रतिक्षाधीन ठेवण्यात आले आहे असे मसुब सुरक्षा कर्मी. त्याचप्रमाणे, ज्या उमेदवारांना महाराष्ट्र सुरक्षा बलात सुरक्षा रक्षक भरती होवून या पूर्वी प्रशिक्षणास पाठवण्यात आले होते, परंतु राजीनामा, गैरहजर किंवा भगोडा या कारणामुळे प्रशिक्षण सोडून गेलेले किंवा प्रशिक्षण पूर्ण केलेले असून महामंडळाच्या नेमणूक प्रतिक्षाधीन यादीवर आहेत. असे उमेदवार सन- २०२४-२५ जाहिरातीस अनुसरून झालेल्या पोलीस भरतीच्या प्रतिक्षाधीन/ पात्र यादीवर आहेत. त्यांना त्यांच्या मोबाईल क्रमांकावर संदेश मिळाला तरी त्यांनी भरती नोंदणीसाठी हजर राहू नये. असे उमेदवार यांची भरती नोंदणी झाली तरी पडताळणीमध्ये निदर्शनास आल्यानंतर त्यांना भरती प्रक्रियेतून बाद करण्यात येवून अपात्र ठरवण्यात येईल.

४) तसेच जे उमेदवार सन २०२४-२०२५ च्या पोलीस भरती मध्ये उभे राहीलेले नाहीत असे उमेदवार यांनी गैरमार्गाने सदर भरती मध्ये प्रतिक्षाधीन / पात्र उमेदवार असल्याचे भासवून किंवा दिशाभूल करुन महामंडळात सुरक्षा रक्षक म्हणून भरती होवून नेमणूक मिळवण्याचा प्रयत्न केल्यास अशा उमेदवारांच्याविरुध्द योग्य ती कायदेशीर कारवाई (फौजदारी गुन्हा) करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

५) भरती नोंदणी प्रकिये मध्ये पात्र झाल्यानंतर उमेदवाराला प्रशिक्षणासाठी हजर राहण्यासाठी त्यांचे नोंदणीच्या वेळी दिलेल्या मोबाईल क्रमांकावर संदेश देण्यात येतील. त्यासाठी त्यांनी त्यांचा मोबाईल चालु स्थितीत ठेवणे आवश्यक आहे यांची नोंद घ्यावी. महामंडळाने दिलेल्या दिनांक व वेळेस संबंधित प्रशिक्षण केंद्राच्या ठिकाणी हजर राहताना खालील बाबीची पुर्तता करावी लागेल.

**i)** उमेदवाराचा नियुक्ती पुर्व मुलभुत प्रशिक्षणाचा कालावधी ४५ दिवसाचा असेल व महामंडळाने ठरविलेल्या महाराष्ट्रातील कोणत्याही ठिकाणच्या प्रशिक्षण केंद्रात त्यास प्रशिक्षणास पाठविण्यात येईल त्या ठिकाणी त्यास वेळेस हजर राहावे लागेल.

**ii)** प्रशिक्षणास हजर राहताना प्रशिक्षण शुल्क म्हणुन सुरक्षा अनामत रक्कम रु. २०,०००/- भरणा करावी लागेल. (त्यापैकी रु. १५,०००/- Non-Refundable आणि रु.५,०००/- Refundable असतील. सदरची Refundable रक्कम उमेदवारास नियुक्तीसाठी संदेश दिल्यानंतर नियुक्ती तात्काळ स्विकारल्यानंतर व एक करार कालावधी पुर्ण केल्यानंतरच परत करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.)

**iii)** उमेदवारास प्रशिक्षणासाठी हजर होण्याचा संदेश आल्यास प्रशिक्षण केंद्रावर हजर होताना प्रशिक्षणास सक्षम असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र व चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र सोबत घेऊन येणे आवश्यक आहे. भरती नोंदणी झाल्यानंतर सदरच्या कागदपत्राची पुर्तता करण्यात यावी.

MAHARASHTRA STATE SECURITY CORP. सत्यमेव जयते M. S. MUMBAI

..४/-

**iv)** उमेदवारांनी प्रशिक्षण पुर्ण केल्यानंतर त्यास महामंडळात नेमणुक देण्यात येते. त्यावेळी त्याचे EPF Account तयार करण्यात येते. त्यासाठी उमेदवारांस स्वत: UAN नंबर Generate करावा लागतो. यासाठी त्याचे आधारकार्ड क्रमांकामध्ये कोणत्याही त्रुटी नसाव्यात. त्याच्या नावाची इंग्रजी स्पेलींग बरोबर असावी. तसेच जन्मतारिख (DD/MM/YYYY) अशा फॉरमेट मध्ये पुर्ण असावी. तसेच त्यांच्या आधारकार्ड क्रमांकाशी स्वत:च्या नावे असलेला मोबाईल नंबर लिंक करणे आवश्यक आहे. याची नोंद घेवून याप्रमाणे योग्य ती कार्यवाही करावी.

६) जरी उमेदवार भरती नोंदणीसाठी पात्र ठरला तरी एखाद्या उमेदवारा विरुध्द गुन्हा नोंद असल्याबाबत किंवा इतर आक्षेपार्ह चारित्र्य पडताळणी अहवाल असल्यास सदर उमदेवारास प्रशिक्षणास संधी देण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

MAHARASHTRA STATE SECURITY CORPORATION
सत्यमेव जयते
M. S. MUMBAI

**(राहुल श्रीरामे)**
पोलीस अधीक्षक तथा
महाव्यवस्थापक (भरती व प्रशिक्षण)
महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ.